# KRANTI INDUSTRIES LIMITED

Date: February 12, 2022

To,
The Manager,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street, Fort
Mumbai- 400001

Script Code: 542459
Script Symbol: KRANTI

Subject: Submission of News-Paper Advertisement with respect to publication of Un-audited Financial Results (Standalone as well as Consolidated) for the 3rd Quarter and Nine Months ended on 31st December, 2021.

Dear Sir/Madam,

We wish to inform that pursuant to Regulation 47 and Regulation 30 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosed herewith the Newspaper publication copies of the extract of Standalone and Consolidated Financial Results for the 3rd Quarter and Nine Months ended on 31st December, 2021, published in below mentioned Newspapers on Saturday, 12th February, 2022.

1. The Business Standard (English Edition) and
2. Samana (Marathi Edition)

The newspaper publication is also uploaded and available on our company website: www.krantiindustries.com

You are requested to kindly take the same on record please.

Thanking you.

Yours' sincerely,
For **KRANTI INDUSTRIES LIMITED**

KRANTI INDUSTRIES LTD * PIRANGUT *

**BHAVESH SUBHASH SELARKA**
**(COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER)**
**MEMBERSHIP NO.: A42734**

*Enclosed: as above.*

# KRANTI INDUSTRIES LIMITED

KRANTI GROUP
KRANTI INDUSTRIES LIMITED
Registered Office :Gat No. 267/B/1, At Post Pirangut, Tal. Mulshi, Pune – 412115, Maharashtra, India
Ph. +91 20 6675 5676 ,CIN: L29299PN1995PLC095016 email.info@krantiindustries.com Web: www.krantiindustries.com

## EXTRACT OF THE STANDALONE AND CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31 DECEMBER 2021

(Rs.in lakhs)

| Sr. No. | Particulars | STANDALONE | | | | | | CONSOLIDATED | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | For Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended | For Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year ended |
| | | 31-12-21 (Unaudited) | 30-09-21 (Unaudited) | 31-12-20 (Unaudited) | 31-12-21 (Unaudited) | 31-12-20 (Unaudited) | 31-03-21 (Audited) | 31-12-21 (Unaudited) | 30-09-21 (Unaudited) | 31-12-20 (Unaudited) | 31-12-21 (Unaudited) | 31-12-20 (Unaudited) | 31.03.21 (Audited) |
| 1 | Revenue from Operations | 2,558.59 | 2,498.54 | 1,836.40 | 6,960.00 | 3,355.70 | 5,400.77 | 2,604.43 | 2,537.69 | 1,900.20 | 7,084.69 | 3,466.54 | 5,573.19 |
| 2 | Other Income | 3.86 | 3.11 | ( 0.32 ) | 12.91 | 1.28 | 41.68 | 3.68 | 2.96 | (0.51 ) | 12.42 | 0.83 | 41.21 |
| 3 | Total Income | **2,562.45** | **2,501.65** | **1,836.08** | **6,972.91** | **3,356.99** | **5,442.44** | **2,608.11** | **2,540.65** | **1,899.69** | **7,097.11** | **3,467.36** | **5,614.41** |
| 4 | Net Profit (Loss) Before Tax | 115.42 | 88.45 | 17.42 | 262.71 | (188.63 ) | ( 11.84 ) | 113.01 | 80.69 | 26.33 | 261.21 | ( 202.90 ) | ( 22.21 ) |
| 5 | Net Profit / (Loss) after tax | 57.51 | 88.45 | 23.17 | 204.81 | ( 219.11 ) | ( 5.65 ) | 52.02 | 80.69 | 32.88 | 200.22 | ( 230.75 ) | ( 12.64 ) |
| 6 | Total Comprehensive Income/(loss) for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income/(Loss)(after tax) | **57.51** | **88.45** | **23.93** | **204.81** | **( 216.80 )** | **( 2.58 )** | **52.02** | **80.69** | **33.65** | **200.22** | **( 228.45 )** | **(9.57 )** |
| 7 | Paid up Equity Share Capital | 1,056.24 | 1,056.24 | 880.20 | 1,056.24 | 880.20 | 880.20 | 1,056.24 | 1,056.24 | 880.20 | 1,056.24 | 880.20 | 880.20 |
| 8 | Other Equity (Excluding non-controlling interest) | | | | | | 1,136.42 | | | | | | 1,136.42 |
| 9 | Earnings Per Share (of Rs.10/- each) (for continuing and discontinued operations) | | | | | | | | | | | | |
| | 1. Basic: (In Rupees) | 0.54 | 0.84 | 0.26 | 1.94 | ( 2.49 ) | ( 0.06 ) | 0.49 | 0.76 | 0.31 | 1.90 | ( 2.18 ) | ( 0.12 ) |
| | 2. Diluted (In Rupees) | 0.54 | 0.84 | 0.26 | 1.94 | ( 2.49 ) | ( 0.06 ) | 0.49 | 0.76 | 0.31 | 1.90 | ( 2.18 ) | ( 0.12 ) |

NOTES:

1 The above is an extract of the detailed format of Quarterly and Nine Months ended on 31st December, 2021 filed with the BSE Ltd under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the said Financial Results are available on the websites of the Company: www.krantiindustries.com and also avaiable on BSE LTD: www.bseindia.com

2 The above financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at its meeting held on Friday, 11th February, 2022. The Statutory Auditor of the Company have carried out a limited review of the aforesaid results and expressed an unmodified review opinion.

3 These Financial Results of the Company / Group have been prepared in accordance with Section 133 of the Companies Act, 2013 read with Companies (Indian Accounting Standard) Rules, 2015 (IND-AS) (as amended) and other relevant rules issued thereunder and SEBI(LODR) Regulations, 2015, as amended.

4 The Company has migrated from BSE-SME platform to Main Board of the BSE Ltd. on November 02, 2021.

By order of the Board of Directors of
**Kranti Industries Limited**
Sd/- Mr Sachin Subhash Vora
Chairman & Managing Director DIN: 02002468

Place: Pune
Date : 11/02/2022




WHAT'S ON
**PAPER**
MATTERS.

Business Standard newspaper
delivering safely to homes and offices

For details, SMS **reachbs** to **57575** or email **order@bsmail.in**

Business Standard
Insight Out

bsindia bsindia business-standard.com

## 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' अंतर्गत नदीपात्र स्वच्छता उपक्रम

'वी पुणेकर' संस्थेतर्फे व्हॅलेंटाइन डेच्या पूर्वसंध्येला रविवारी (दि. १३) पुण्यातील नदीपात्रातील विविध घाटांत नदी प्रदूषण थांबविण्यासाठी नदीपात्रातील कचरा बाहेर काढण्यासाठी 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' हा उपक्रम १० ठिकाणी राबविण्यात येणार आहे. जगभरासह देशात १४ फेब्रुवारी हा दिवस व्हॅलेंटाइन डे म्हणून मोठ्या प्रमाणावर साजरा केल्याचे दिसून येते. त्याच अनुषंगाने हा उपक्रम हाती घेतला आहे. रविवारी सकाळी ८ वाजता उपक्रमाची सुरुवात होणार आहे. यात पुण्यातील सुमारे ८० महाविद्यालयांतील तरुण, नागरिक, स्वयंसेवक सहभागी होणार असून, नदी स्वच्छ करण्याबरोबरच नदीचं प्रदूषण रोखण्यासाठी जनजागृतीदेखील करण्यात येणार आहे, अशी माहिती वी पुणेकर संस्थेच्या आम्रपाली चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नीलेश जंजिरे, स्वप्नील पवार, चंकी पांडे, समीर पौलस्ते, दत्ता बालशंकर उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमासाठी संस्थेतर्फे नदीतीरावरील ब्रिज व घाटाच्या बाजूला अभियान राबविण्यात येणार आहे. नदी स्वच्छतेसाठी किट वाटप करून नदी स्वच्छता अभियानदेखील राबविण्यात येणार आहे. शहरातील नद्या स्वच्छ करून यामुळे नदीचे प्रदूषण रोखले जाणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

### जिल्हा बँकेच्या पावणेतीन लाख शेतकऱ्यांना मिळेल लाभ

# शून्य टक्क्याने तब्बल २१०० कोटींचे पीककर्ज

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)– पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे (पीडीसीसी) चालू वर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामात मिळून जानेवारी २०२२ अखेरपर्यंत जिल्ह्यातील दोन लाख ८५ हजार ३६४ शेतकऱ्यांना पाच लाख रुपयांच्या मर्यादेत दोन हजार ११० कोटी १९ लाख ८४ हजार रुपयांचे पीककर्ज वाटप केले आहे.

या सर्व शेतकऱ्यांनी कर्जाची दिलेल्या मुदतीत परतफेड केल्यास, या सर्वांना शून्य टक्के व्याजाचा लाभ मिळू शकणार आहे. पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून व्याज सवलत दिली जाते. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळणाऱ्या व्याजाच्या व्यतिरिक्त बँकेच्या नफ्यातून लिखित व्याज सवलत देत खरीप हंगामातील पिकांसाठी पाच लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाचा लाभ देण्याचा निर्णय घेतला. या योजनेचा फायदा मिळण्यासाठी त्यांच्याकडील पीककर्जाची ३१ मार्चपर्यंत परतफेड करणे आवश्यक आहे. या मुदतीत पीककर्जाची परतफेड केली, तरच संबंधित शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराचा फायदा मिळू शकेल.

जिल्हा बँकेने सद्य:स्थितीत एक लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जासाठी द.सा.द.शे. ६ टक्के व्याजदराने पीककर्ज वाटप केले जाते; परंतु यापैकी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून प्रत्येकी तीन टक्के व्याजाचा परतावा शेतकऱ्यांना मिळत असतो. त्यामुळे या कर्जाचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना पाच लाखपर्यंतचे पीककर्ज शून्य टक्के व्याजाने दिले जाते.

तीन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जासाठीसुद्धा व्याजदर हा सहा टक्केच आहे; मात्र यापैकी केंद्र सरकार तीन टक्के, राज्य सरकार एक टक्का आणि जिल्हा बँक दोन टक्के व्याजदराचा परतावा देत असते, त्यामुळे शेतकऱ्यांना हे कर्ज शून्य टक्के व्याजदराने मिळते.

**अगोदर व्याजासह थकबाकी भरावी लागणार**

■ व्याजाच्या सवलतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे शून्य टक्के व्याजाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधी त्यांच्याकडील कर्जाचा परतावा व्याजाच्या रकमेसह अगोदर बँकेमध्ये भरणा करावा लागेल, त्यानंतर व्याजाची रक्कम अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल.

### अवकाळी, परतीच्या पावसाचा फायदा

## जानेवारीत भूजलपातळी दीड ते अडीच फुटांनी वाढली

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)– पुणे जिल्ह्यात परतीचा आणि अवकाळी पाऊस चांगला झाल्याचा परिणाम जिल्ह्यातील भूजल पातळीत वाढ होण्यात झाला आहे. जिल्ह्यातील भूजल पातळीत सरासरी दीड ते अडीच फुटांनी वाढ झाली आहे. दौंड, बारामती, इंदापूर, पुरंदर आणि शिरूर तालुक्यांमध्ये पाणीपातळीत चांगली वाढ झाल्याचा भूजल सर्वेक्षण विभागाचा अहवाल आहे.

जमिनीतील पाणी पातळीचे भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत दर तीन महिन्यांनी परीक्षण केले जाते. भूजल पातळीच्या नोंदी घेतल्या जातात. या नोंदीतून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील भूजल पातळीत झालेली वाढ तसेच घट समजते. यंदा जानेवारी २०२२ मध्ये भूजल पातळीचा मागील पाच वर्षांच्या जानेवारीमधील सरासरी भूजल पातळीशी तुलनात्मक स्थितीचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये जिल्ह्यात भूजल पातळीत चांगली वाढ झाल्याचे समोर आले. दुष्काळी व कमी पावसाच्या पाच तालुक्यांमध्ये भूजल पातळीत सव्वा फूट ते अडीच फुटांपर्यंत वाढ झाली आहे.

भूजल सर्वेक्षण विभागाने जिल्ह्यातील १३ तालुक्यांत भूजल पातळीत सरासरी १.५० ते २.६२ फुटाने वाढ झाल्याचे दिसून आले आहे. भूजल पातळीत सर्वाधिक वाढ दौंड तालुक्यात आहे. या ठिकाणी २.६२ फूट भूजल पातळीत वाढ नोंदविण्यात आली आहे. बारामती तालुक्यात १.७५ फूट, इंदापूरमध्ये १.३१ फूट, पुरंदरमध्ये २.६० फूट आणि शिरूरमध्ये १.८० फूट वाढ झाली आहे. सर्वाधिक पाऊस पडत असलेल्या तालुक्यांमध्ये परतीचा पाऊस समाधानकारक न झाल्याने तेथील भूजल पातळीत अल्प वाढ झाल्याचे जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक संतोष गावडे यांनी सांगितले.

मावळ, मुळशी, वेल्हा आणि भोर तालुक्यांमध्ये अर्ध्या फुटापर्यंत वाढ झाली आहे. भूजल पातळीचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यात १९२ निरीक्षण विहिरी निश्चित केल्या आहेत. त्याद्वारे भूजल पातळीच्या नोंदी दर तीन महिन्यांनी नोंदवली जाते. जिल्ह्याच्या काही भागात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने त्या भागांमध्ये पाणी पातळीत घट झाल्याचे दिसून आले आहे.

## कात्रजची निवडणूक २० मार्चला होणार

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ म्हणजेच कात्रज डेअरीच्या संचालक मंडळाची निवडणूक २० मार्च रोजी जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सोमवारी १४ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे.

महाराष्ट्र सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर कात्रज दूध संघाच्या संचालक मंडळासाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा सहकार उपनिबंधक, मिलिंद सोबले यांनी सहकारी निवडणूक प्राधिकरणाला सादर केलेल्या निवडणूक कार्यक्रमाला मंजुरी दिल्याचे पत्र प्राधिकरणाचे सचिव यशवंत गिरी यांनी दिले आहेत.

**सोमवारपासून उमेदवारी अर्ज**

संघाच्या संचालकपदाच्या १६ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. यामध्ये जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, मावळ, मुळशी, हवेली, भोर, वेल्हा, पुरंदर आणि दौंड या अकरा तालुक्यांसाठी दूध उत्पादक सोसायटी यांचा प्रत्येकी एका गटातून एक संचालक निवडला जाईल. महिला संचालकांसाठी दोन जागा असून, अनुसूचित जाती–जमाती भटक्या विमुक्त जाती आणि इतर मागास वर्गासाठी प्रत्येकी एका जागेसाठी निवडणूक होईल.

**निवडणूक कार्यक्रम**

■ १४ ते १८ फेब्रुवारी दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करणे ■ २१ फेब्रुवारीला उमेदवारी अर्जांची छाननी ■ २२ फेब्रुवारीला वैध उमेदवारांची यादी ■ २२ फेब्रुवारी ते आठ मार्च उमेदवारी अर्ज मागे घेता येतील ■ ९ मार्च उमेदवारांना चिन्हवाटप ■ २० मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान ■ २१ मार्च रोजी मतमोजणी

## वारे गुरुजी आता थेट राज्यमंत्री बच्चू कडू यांचे ओएसडी

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – शिरूर तालुक्यातील वाबळेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या आंतरराष्ट्रीय शाळेवरील प्रभारी मुख्याध्यापक यांचे निलंबन रद्द करून त्यांची पुनर्स्थापना खेड तालुक्यातील जालिंदर नगर शाळेवर केल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्यांची नियुक्ती शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या कार्यालयात विशेष कार्य अधिकारी म्हणून करण्यात आली आहे.

याचदरम्यान वारे गुरुजींचा जवळून संपर्क आलेले आणि त्यांच्यामागे भक्कम उभे राहिलेले शालेय शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मात्र निलंबन मागे घेताच वारे गुरुजींना थेट आपल्या कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणून सेवावर्ग करून घेण्याचा निर्णय घेतला. झेडपीसाठी हा निर्णय चपराक मानला जातो. कडू यांच्या मागणीवरून ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांनीही तत्काळ दखल घेत वारेंना सेवामुक्त करण्याचा आदेश पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांना नुकतेच दिले. त्यामुळे वारे गुरुजी आता थेट शिक्षण मंत्र्यांचे ओएसडी म्हणून रुजू होतील.

## शहरात ७०० नवे रुग्ण; ६ मृत्यू

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)– शहरात शुक्रवारी (दि. ११) दोन हजार १९७ रुग्णांनी कोरोनावर मात केली, तर ७०० नव्या बाधितांची नोंद झाली. दिवसभरात ६ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असून, यात पुण्याबाहेरील ४ जणांचा समावेश आहे.

पुणे महापालिका क्षेत्रात विविध कोविड सेंटर्स, खासगी लॅब आणि रॅपिड ॲण्टिजेन किटद्वारे शुक्रवारी दिवसभरात ६ हजार ४४८ जणांची कोरोना चाचणी करण्यात आली. त्यात ७०० रुग्ण आढळून आले आहेत. शहरात आजपर्यंत ६ लाख ५५ हजार ९९६ पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील ६ लाख ३९ हजार १८१ जण बरे झाले आहेत. शहरात सध्या ७ हजार ४८९ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. त्यातील ३५ जण व्हेंटिलेटरवर, तर २०४ जण ऑक्सिजनवर आहेत. शहरात आजपर्यंत ९ हजार ३२६ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. शहरातील एकूण ॲक्टिव्ह रुग्णांच्या तुलनेत रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांचे प्रमाण हे ८.८७ टक्के एवढे आहे.

## देवगडपाठोपाठ रत्नागिरी हापूस मार्केटयार्डात दाखल

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – कोकणातील देवगड आंब्यापाठोपाठ रत्नागिरी हापूस आंब्याच्या पाच पेट्या शुक्रवारी मार्केटयार्डात दाखल झाल्या. या पाच डझनाच्या एका पेटीला तब्बल ३१ हजार रुपये भाव मिळाला. फेब्रुवारीअखेर नियमित आंब्याची आवक सुरू होण्याचा अंदाज शेतकरी, आडते वर्तवित आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील रीळ या गावातून शेतकरी मकरंद काणे यांच्या बागेतून मे. गणेश फ्रुट एजन्सी अरविंद मोरे यांच्या गाळ्यावर पाच पेट्या विक्रीसाठी शुक्रवारी दाखल झाल्या. लिलावात फळांचे आडतदार युवराज काची यांनी तब्बल ३१ हजार रुपयांना एक पेटी याप्रमाणे खरेदी केली. ज्येष्ठ आडतदार एकनाथ यादव, आडते असोसिएशनचे संचालक गणेश यादव, विनोद परदेशी, सुधीर मनुसुख, सुनील वंजारी, जगन्नाथ वंजारी, रावसाहेब कुंजीर, हमजू भोले, अब्दुल चौधरी, नीलेश शिंदे आदी उपस्थित होते.



■ नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांच्या पुढाकाराने सुरू केलेल्या दिव्यांग आधार व सुविधा केंद्राचा द्विवर्षपूर्तीनिमित्त कार्यक्रम झाला. यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, नगरसेवक दीपक पोटे, भाजप शहर प्रवक्ते संदीप खर्डेकर, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, माधुरी सहस्रबुद्धे, नगरसेवक दिलीप वेडे–पाटील, बापूसाहेब मेंगडे, ॲड. मिताली सावळेकर, प्रशांत हरसुले, राजेंद्र येडे, नीलेश गरुडकर, ॲड. प्राची बगाटे, प्रतीक खर्डेकर, हेमंत बोरकर, श्रीकांत गावडे, पल्लवी गाडगीळ, कल्याणी खर्डेकर आदी उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सदनिका/फ्लॅट मिळकत **श्री. दत्तात्रय मारूती ससाणे, रा. ८१/१अ, हिंगणे मळा, भैरवनाथ मंदिराजवळ, हडपसर, पुणे–४११०२८** यांचे मालकी वहिवाटीची असून, सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित असून, ती मालकी हक्कासह हस्तांतरण करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा या सदनिका मालकांनी दिलेला असून, सदर सदनिका मिळकत आमचे अशिलांना कायमखूश खरेदी देण्याचे मान्य करून **विसारा** रक्कम स्वीकारून तशी विसार पावती लिहून दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीवर कोणासही गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, अन्न, वस्त्र, पोटगी सिक्युरिटी, साठेखत, बँककर्ज इत्यादी जडजोखमीत लेखी अथवा तोंडी बोलीने गुंतविली नसल्याचे कबुल केलेले आहे. तरीदेखील सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध दावा, चार्ज किंवा इतर बोजा असल्यास तो त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे व त्यावर कोणाचेही हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत, असे समजून सदर मिळकतीबाबत आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार अथवा हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच, कोणाचाही, कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याकरिता ही जाहीर नोटीस असे.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली जिल्हा पुणे म.न.पा. हद्दीमधील गाव मौजे हडपसर येथील सि. स. नं. २७८९ यांसी स. नं. ८१ हिस्सा नं. १अ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **वलय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित** यामधील इमारत **ए** मधील पहिल्या मजल्यावरील **फ्लॅट/सदनिका नं. १०१** यांसी क्षेत्र ५५.१६ चौ.मी. म्हणजेच ५९३.७५ चौ. फूट कारपेट तसेच लगत टेरेस क्षेत्र **९.२९ चौ.मी.** म्हणजेच १०० चौ. फूट असे एकूण क्षेत्र ८३.७९ चौ. मी. म्हणजेच ९०२ चौ. फूट व कव्हर्ड कार पार्किंग ही फ्लॅट मिळकत. तसेच, या फ्लॅटमधील व सोसायटीमधील एकत्रित सर्व सोयीसुविधांसह दरोबस्त.

जाहीर नोटीस दिली दिनांक ११/०२/२०२२

खरेदीदारातर्फे
सही/–
**( ॲड. अरूण एम. खुटेकर )**
स. नं. २६/२/१, औदुंबर कॉम्प्लेक्स, अे विंग, ऑफिस नं. एस–६,
झील कॉलेज चौक, कॅनरा बँकेसमोर, नऱ्हे–धायरी रोड, पुणे–४११०४१.
मोबा.: ९४२२०८९७६८

## चोरीचे मोबाईल विकण्यासाठी आलेले दोघे अटकेत

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – चोरीचे मोबाईल विक्रीसाठी कोंढवा येथे आलेल्या दोघांना गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाने जेरबंद केले. आरोपींकडून चोरीचे चार गुन्हे उघडकीस आले असून, चार मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

सलीम उमर शहा (२५, रा. कात्रज, मूळ रा. परभणी), गणेश महादेव अवचारे उर्फ पाटील (२७, रा. कात्रज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. कोंढव्यातील कपिलनगर येथे मोबाईल विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. यानुसार पथकाने कपिलनगर येथील मोकळ्या मैदानात सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, चोरीचे चार मोबाईल मिळून आले आहेत. आरोपींकडून चार गुन्हे उघडकीस आले आहेत. कोंढवा, बिबवेवाडी आणि मार्केटयार्ड पोलिसांकडील गुन्ह्यात आरोपी पाहिजे असल्याचे तपासात समोर आले आहे. ही कामगिरी युनिट पाचचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, एपीआय प्रसाद लोणारे, उपनिरीक्षक सोमनाथ शेंडगे, अंमलदार रमेश साबळे, प्रमोद टिळेकर, दया शेगर, आश्रुबा मोराळे, अजय गायकवाड, महेश वाघमारे, दीपक लांडगे, प्रवीण काळभोर, विशाल भिलारे, विनोद शिवले, अकबर शेख यांच्या पथकाने केली.

यूको बैंक UCO BANK
(भारत सरकारचा उपक्रम) (A Govt. of India undertaking)

**विक्रेत्यांना सूचीबद्ध करण्यासाठी निविदेची सूचना**

युको बँक, विभागीय कार्यालय, पुणे, **आपल्या नियंत्रणात असलेल्या शाखांसाठी सीसीटीव्ही आणि अलार्म सिस्टीम यंत्रणा स्थापन करण्यासाठी आणि देखभाल करण्याच्या उद्देशाने नामांकित विक्रेत्यांना सूचीबद्ध करण्यासाठी सीलबंद निविदा आमंत्रित करीत आहे.** तपशीलवार अटी व शर्तीसह निविदा संबंधित कागदपत्रे आमच्या कार्यालयात उपलब्ध आहेत किंवा आमच्या बँकेच्या **www.ucobank.com** वेबसाइटवरून डाउनलोड केली जाऊ शकतात. सीलबंद निविदा युको बँक, विभागीय कार्यालय, पुणे, २१९०/२१९१, संस्कृत विद्या मंदिर क्रीडा संकुल, गल्ली क्रमांक ४, सहकारनगर क्रमांक १, पुणे –४११००९ येथे **दि. ०७ मार्च, २०२२** रोजी **सायंकाळी ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी सादर कराव्यात. अधिक माहितीसाठी कृपया ०२०–२४५४४०१९ वर संपर्क साधा

**विभागीय व्यवस्थापक**

### टीईटी घोटाळा

## तीन आरोपींना पोलीस कोठडी

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) – शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) गैरव्यवहारप्रकरणी तुकाराम सुपे यांना याप्रकरणी यापूर्वी अटक आरोपी अश्विनकुमार शिवकुमार याने ३० लाख रुपये दिल्याचे शिवकुमार याने जबाबत सांगितले आहे. दरम्यान, याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तिघांना न्यायालयाने १६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

तुकाराम सुपे, संतोष लक्ष्मण हरकळ (वय ४२) व अंकुश रामभाऊ हरकळ (वय ४४) यांना अटक करण्यात आली आहे. २०१८ साली झालेल्या टीईटीच्या निकालाबाबत परीक्षा परिषदेकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तसेच जळगाव येथील शिक्षणाधिकाऱ्यांकडून ८१ बनावट प्रमाणपत्रे मिळाल्यानंतर त्यानंतर सुपे यांनी कोणतीही कारवाई केली नाही. हरकळ याच्या विद्यार्थ्यांच्या यादीतील १८ परीक्षार्थींना गुणपत्रक न मिळाल्याने शिवकुमार याने त्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची रंगीत प्रिंट काढून मुंबईतील एका एजंटला नेऊन दिली. सखोल तपास करण्यासाठी तिघांना पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी केला.

KRANTI GROUP
KRANTI INDUSTRIES LIMITED

# क्रांती इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: गट क्र.२६७/बी/१, मु.पो. पिरंगुट, ता. मुळशी, पुणे ४१२११५, महाराष्ट्र ( भारत )

फोन : +91 20 6675 5676 CIN: L29299PN1995PLC095016 ईमेल: info@krantiindustries.com Web: www.krantiindustries.com

**३१ डिसेंबर २०२१ ला संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे स्वतंत्र आणि एकत्रित लेखापरीक्षणपूर्व आर्तिक परिणाम** (आकडे लाखात)

| अ.क्र. | तपशील | स्वतंत्र : तिमाही अखेर | | | नऊ महिन्यांअखेर | | वर्ष अखेरीस | एकत्रित:: तिमाही अखेर | | | नऊ महिन्यांसाठी | | वर्ष अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-12-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 30-09-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-20 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-20 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-03-21 (लेखापरीक्षित) | 31-12-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 30-09-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-21 (लेखापरीक्षणपूर्व) | 31-12-20 (लेखापरीक्षणपूर्व) | 31.03.2021 (लेखापरीक्षित) |
| 1 | व्यवसायातून उत्पन्न | 2,558.59 | 2,498.54 | 1,836.40 | 6,960.00 | 3,355.70 | 5,400.77 | 2,604.43 | 2,537.69 | 1,900.20 | 7,084.69 | 3,466.54 | 5,573.19 |
| 2 | अन्य उत्पन्न | 3.86 | 3.11 | ( 0.32 ) | 12.91 | 1.28 | 41.68 | 3.68 | 2.96 | (0.51 ) | 12.42 | 0.83 | 41.21 |
| 3 | एकूण उत्पन्न | 2,562.45 | 2,501.65 | 1,836.08 | 6,972.91 | 3,356.99 | 5,442.44 | 2,608.11 | 2,540.65 | 1,899.69 | 7,097.11 | 3,467.36 | 5,614.41 |
| 4 | करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) | 115.42 | 88.45 | 17.42 | 262.71 | ( 188.63 ) | ( 11.84 ) | 113.01 | 80.69 | 26.33 | 261.21 | ( 202.90 ) | ( 22.21 ) |
| 5 | करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) | 57.51 | 88.45 | 23.17 | 204.81 | (219.11 ) | ( 5.65 ) | 52.02 | 80.69 | 32.88 | 200.22 | (230.75 ) | ( 12.64 ) |
| 6 | संबंधित काळासाठी एकूण उत्पन्न/(तोटा) करपश्चात नफा/तोटा आणि अन्य एकूण उत्पन्न/(तोटा | 57.51 | 88.45 | 23.93 | 204.81 | (216.80 ) | ( 2.58 ) | 52.02 | 80.69 | 33.65 | 200.22 | (228.45 ) | ( 9.57 ) |
| 7 | वसूल भाग भांडवल | 1,056.24 | 1,056.24 | 880.20 | 1,056.24 | 880.20 | 880.20 | 1,056.24 | 1,056.24 | 880.20 | 1,056.24 | 880.20 | 880.20 |
| 8 | अन्य भांडवल ( नियंत्रण रुची नसलेले सोडून) | | | | | | 1,136.42 | | | | | | 1,136.42 |
| 9 | प्रतिसमभाग उत्पन्न (रु.१०/–दर्शनी मूल्य) (सततच्या आणि खंडित व्यवहारांसाठी) १. मूलभूत(आकडे रुपयात) | 0.54 | 0.84 | 0.26 | 1.94 | ( 2.49 ) | ( 0.06 ) | 0.49 | 0.76 | 0.31 | 1.90 | ( 2.18 ) | ( 0.12 ) |
| | २. विरळ (आकडे रुपयात) | 0.54 | 0.84 | 0.26 | 1.94 | ( 2.49 ) | ( 0.06 ) | 0.49 | 0.76 | 0.31 | 1.90 | ( 2.18 ) | ( 0.12 ) |

टीपा:
१. वरील विवरण हे सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) २०१५ मधील रेग्युलेशन क्र.३३ अन्वये बी एस ई लि. यांना सादर केलेल्या ३१ डिसेबर २०२१ अखेर संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या सविस्तर विवरणाचा संक्षिप्त भाग आहे. विहीत नमुन्यातील आर्थिक परिणाम कंपनीच्या **www.krantiindustries.com** या संकेतस्थळावर आणि बीएसई लि. च्या **www.bseindia.com** या संकेत स्थळावरही उपलब्ध आहेत.
२. वरील आर्थिक परिणामांचा आढावा ऑडिट कमिटीने घेतलेला आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने शुक्रवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या सभेत मंजूरही केलेले आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतलेला आहे आणि कोणतीही दुरुस्ती न सुचविता आढावा मत दिलेले आहे.
३. कंपनीची/समुहाची सदर आर्थिक परिणाम विवरणे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३, कंपनी(इंडियन अकाऊंटिंग स्टॅंडर्ड) नियम २०१५ ( आयएनडी–एएस )( वेळोवेळी दुरुस्त केल्यानुसार) आणि त्याअंतर्गत केलेले त्यातील संबंधित नियम आणि सेबी (एल ओ डी आर) नियम २०१५ ( सुधारित ) यानुसार तयार केलेली आहेत.
४. कंपनी दिनांक ०२ नोव्हेंबर २०२१ रोजी बीएसई–एस एम ई व्यासपीठावरुन (प्लॅटफॉर्म ) वरुन बी एस ई लि. च्या मुख्य बोर्डावर स्थलांतरित झालेली आहे.

स्थळ: पुणे
दिनांक: 11/02/2022

क्रांती इंडस्ट्रीज लि. च्या संचालक मंडळाचे आदेशानुसार
सही/– श्री. सचिन सुभाष वोरा
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक DIN: 02002468